RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक १९] बुधवार, जून १८, २०२५/ज्येष्ठ २८, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ३९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जून २०२५.

### अधिसूचना

क्रमांक रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.१२/का-७.– ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व २४३झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, न्याय्य व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील कलम १२(१) व ५८(१)(अ) मध्ये अनुक्रमे पुढीलप्रमाणे तरतूद आहे :- जिल्हा परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी राज्य निवडणूक आयोग प्रत्येक जिल्ह्याची विभागणी निवडणूक विभागात करील व राज्य निवडणूक आयोगाकडून, त्या गटातील प्रत्येक निवडणूक विभागाची दोन निर्वाचक गणात विभागणी करण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दिनांक ११ मार्च २०२२ च्या सुधारणेन्वये, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील कलम १२ (१) व ५८(१)(अ) या तरतुदीमधील " राज्य निवडणूक आयोग " या मजकुराऐवजी, " राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने राज्य शासन किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी हा मजकूर दाखल करण्यात येईल." अशी सुधारित तरतूद करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील कलम १२ (२) व ५८(१) (अ) (ब) (क) या तरतुदीनुसार जागांचे आरक्षण निश्चित करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहे;

आणि ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२२, दिनांक ११ मार्च २०२२ च्या सुधारणानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मधील कलम १२ (१) व ५८(१)(अ) मधील राज्य शासनास प्राप्त झालेले अधिकार, शासनाने दिनांक १२ जून २०२५ च्या आदेशान्वये संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले आहेत;

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक २९/०९/२०११ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचना करण्याबाबतचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना तसेच प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता देणे व त्यावर प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन प्रभाग रचना अंतिम करणेबाबत अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आदेश अधिक्रमित करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम ९-अ (२) व कलम ९-अ (४) नुसार मिळालेल्या प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

| अ. क्र. (१) | करावयाची कार्यवाही (२) | ते करण्यासाठी जबाबदार अधिकारी (३) |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे आरक्षण ठरविणे. | विभागीय आयुक्त |
| २ | नागरिकांचा मागासवर्ग व महिला (अनूसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) यांच्या आरक्षणासाठी सोडत काढणे. | |
| | (अ) जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागाकरिता | जिल्हाधिकारी |
| | (ब) पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी | संबंधित तालुक्याचे तहसीलदार |
| ३ | निवडणूक विभाग व निर्वाचक गण यासंबंधित प्राप्त झालेल्या हरकती व सूचना यांना सुनावणी देऊन आरक्षणासह प्रभाग रचना अंतिम करणे. | विभागीय आयुक्त. |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**सुरेश काकाणी,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

## STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mumbai 400 032, Dated 18th June 2025.

*NOTIFICATION*

No. SEC/ZPPS-2025/C.R.12/D-7.— In exercise of the powers conferred by Article 243 K and 243 ZA of the Constitution of India, the State Election Commission has been entrusted with the responsibility of conducting elections to local bodies in the State in a free, fair and transparent environment ;

AND WHEREAS, Section 12 sub-section (*1*) and Section 58 (*1*) (*a*) of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 provision as follows :- The State Election Commission shall, for the purposes of election of Councillors divide every District into electoral divisions and each electoral division in the Block shall be divided into two colleges by the State Election Commission ;

AND WHEREAS, the said provision has been replaced *vide* the amendment in Maharashtra Act No. 22, dated 11th March 2022 which states that " Section 12 sub-section (*1*) and Section 58 (*1*) (*a*) of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, the term " State Election Commission" shall be substituted with the term " State Government with the approval of the State Election Commission or an officer authorized by it " ;

AND WHEREAS, as per the provision of Section 12(*2*) and 58(*1*)(*a*)(*b*)(*c*) of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, the State Election Commission has the power of determination of reservation of seats ;

AND WHEREAS, the State Government has delegated its powers under section 12 sub-section (*1*) and Section 58 (*1*) (*a*) of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, ward formation to the concerned District Collector *vide* its Order dated 12th June 2025 ;

AND WHEREAS, it has become necessary to annull the order of the State Election Commission dated 29th September 2011 which delegate the powers conferred on the concerned District Collector regarding preparation of draft ward formation of Zilla Parishads and Panchayat Samiti and on the concerned Divisional Commissioner regarding the finalization of the ward formation after hearing the objections and suggestions received on the draft ward formation.

NOW, THEREFORE, the State Election Commission, in the exercise of its powers under section 9-A(*2*) and Section 9-A (*4*) of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 along with other powers vested in the State Election Commission in this regard, hereby issue the following order :–

| **Sr. No.**<br>**(1)** | **Action to be taken**<br>**(2)** | **Officer responsible for doing so**<br>**(3)** |
|---|---|---|
| 1 | To determine reservation for Scheduled Castes and Scheduled Tribes. | Divisional Commissioner |
| 2 | Drawing of lot for reservation of a Backward Classes of Citizens and women (including women belonging to Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Classes of citizens) | |
| | For the electoral divisions of the Zilla Parishad. | District Collector |
| | 2) For the electoral colleges of the Panchayat Samiti. | Tahsildar of the concerned Taluka |
| 3 | Finalization the ward formation after giving hearing to the objections and suggestion received regarding the electoral division and electoral colleges. | Divisional Commissioner. |

By order of the State Election Commissioner,

SURESH KAKANI,
Secretary,
State Election Commission, Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.